जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम, पुरवठा विभाग वाशिम
क्र.कक्ष-१४/अका/गोदाम/कंत्राट/कावि-१८६/२०२०
दि.१६/१२/२०२०

**वाशिम जिल्हयातील सर्व शासकीय धान्य गोदामातील उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदाना विल्हेवाट करीता ई-निविदा सुचना.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व त्यांचे वतीने जिल्हाधिकारी , वाशिम यांचेकडुन वाशिम जिल्हयासाठी महाराष्ट्र शासन, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग , शासन निर्णय क्र विल्हेवा-३०१८/प्र.क्र.६४/ना.पु.१६-अ दि.१० ऑक्टोबर २०१८ नुसार वाशिम जिल्हयातील शासकीय धान्य गोदामातील उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदाना विल्हेवाटी करीता द्वि लिफाफा पध्दतीने ऑनलाईन ई - निविदा प्रक्रियेद्वारे दि.21/12/2020 सकाळी ११.०० वाजेपासुन ते दि.30/12/2020 सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कालावधीत ई - निविदा मागविण्यात येत आहेत. सदरच्या ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने पाहण्याकरीता www.mahatenders.gov.in व www.washimnic.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

तरी इच्छुक निविदाकारांनी वाशिम जिल्हयातील उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदाना खरेदी करण्याकरीता ई-निविदा सादर करावयाच्या आहेत. विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न होणाऱ्या तसेच अटी पुर्ण न करणाऱ्या निविदाकारांचे अटीसह असलेल्या निविदा अपात्र ठरविण्यात येतील.

विहीत केलेल्या मुदतीत व विहित प्रमाणात प्राप्त निविदा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय निविदा समिती, वाशिम वा त्यांचे प्रतिनीधी दि.31/12/2020 रोजी दुपारी ३.०० जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे उघडण्यात येतील.निविदा उघडतांना सर्व इच्छुक निविदाकारांनी स्वतः वा त्यांनी लेखी प्राधिकृत केलेल्या प्रतिनीधींनी उपस्थित राहावे.

उपरोक्त ई-निविदा संबंधीचा निविदा फॉर्म व निविदासंबंधीच्या अटी व शर्ती याबाबतची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे उपलब्ध आहे . तसेच वरील नमुद शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाचे www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

( शण्मुगराजन एस.)
जिल्हाधिकारी, वाशिम

## खुल्या निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाहीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | ई-निविदा सुचना प्रसिध्द करणे (जाहिरात) | दि.29/12/2020 |
| २ | ई-निविदेची सर्व प्रक्रीया राबविणे | दि29/12/2020सकाळी ११.०० वाजेपासुन ते दि30/12/2020सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| | ई-निविदा फॉर्मची किंमत | रु.५००/- ऑनलाईन भरण्यात यावी. |
| | इसारा रक्कम भरलेचा पुरवा सादर करणे | इसाऱ्याची रक्कम ऑनलाईन भरण्यात यावी. |
| | निविदापूर्व बैठक | दि:28/12/2020 सकाळी ११.०० |
| | निविदा सादर करण्याचा अंतीम दिनांक | दि:30/12/2020 सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| | क) निविदा उघडणे | दि:31/12/2020 दुपारी ३.०० वाजता |
| ३ | अ) जिल्हा स्तरावर निविदा मंजुरीबाबत निर्णय घेणे | निविदा उघडल्यानंतर ८ दिवसाच्या आत |
| | ब) जिल्हास्तरावर निश्चित होणाऱ्या (आधारभुत दरापर्यंतच्या)निविदाकाराबरोबर करारनामा करणे व काम सुरु करण्याची दिनांक | निविदा मंजुर झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत |
| ४ | अ) पहिल्या निविदाप्रक्रियेत ३ पेक्षा कमी ग्राहय निविदा प्राप्त झाल्यास<br>ब) दुसऱ्या निविदा प्रक्रियेत ३ पेक्षा कमी ग्राहय निविदा प्राप्त झाल्यास | ७ दिवसांची मुदतवाढ देण्यात येईल. |

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र:विल्हेवा- ३०१८/प्र.क्र.६४/ना.पु.१६-अ दि.१० ऑक्टोबर २०१८ मध्ये नमुद कार्यपध्दती, अटी व शर्ती निविदाधारकांना बंधनकारक असतील. तसेच संपर्ण निविदा अथवा निविदेचा काही भाग कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, वाशिम यांनी राखुन ठेवलेला आहे.

**टिप :- शासकीय सुटीच्या दिवशी निविदासंबंधी कामकाज बंद राहील.**

**स्थळ :- वाशिम**
**दिनांक :-29/12/२०२०**

(षण्मुगराजन एस.)
जिल्हाधिकारी वाशिम

# महाराष्ट्र शासन
## जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा विभाग वाशिम
## जुन २०२० अखेर पर्यंतच्या शासकीय धान्य गोदामातील शिल्लक उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदान्याची जाहीर ई-निविदाद्वारे विक्री

---

क्र.कक्ष-१४/अका/गोदाम/कावि-१८६/२०२०                                                 दि.२१/१२/२०२०

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे करीता व त्यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांचे कडुन वाशिम जिल्हयातील शासकीय धान्य गोदामातील जुन २०२० अखेर पर्यंतच्या शिल्लक उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदान्याची जाहीर ई-निविदाद्वारे विक्री करणे बाबत शासन निर्णय क्रःविल्हेवा-३०१८/प्र.क्र.४/नापु १६-अ दि. १० ऑक्टोबर २०१८ अन्वये निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार नोव्हेंबर- २०१६ ते जुन-२०२० अखेर पर्यंतच्या उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदान्याची जसा आहे तसा व जेथे आहे तेथे या तत्त्वावर जाहीर ई-निविदाद्वारे विक्री प्रक्रियेची कार्यवाही करण्यात येत आहे.

वाशिम जिल्हायातील तालुकानिहाय शासकीय धान्य गोदामातील शिल्लक बारदाण्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| शा.धा.गोदामाचे नाव | बारदानाचा प्रकार | उपयोगी बारदाना | | | निरुपयोगी बारदाना | | | तुकडा बारदाना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १००कि. | ७५कि. | ५०कि. | १००कि. | ७५कि. | ५०कि. | |
| वाशिम | ज्युट | ० | ० | ६३२ | ० | ० | ५२९५ | ० |
| | प्लास्टीक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| मालेगाव | ज्युट | ० | ० | ९० | ० | ० | ४२८० | ० |
| | प्लास्टीक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| रिसोड | ज्युट | ० | ० | २५ | ० | ० | ४४६३ | ० |
| | प्लास्टीक | ० | ० | ० | ० | ० | ३०० | ० |
| मंगरुळपीर | ज्युट | ० | ० | ४२० | ० | ० | २५५४ | ० |
| | प्लास्टीक | ० | ० | ५७० | ० | ० | ६३४ | ० |
| कारंजा | ज्युट | ० | ० | ४०१ | ० | ० | ७८८५ | ० |
| | प्लास्टीक | ० | ० | ९७७ | ० | ० | १४७३ | ० |
| मानोरा | ज्युट | ० | ० | ९१७ | ० | ० | ३७७८ | ० |
| | प्लास्टीक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | | ० | ० | ४०३२ | ० | ० | ३०६६२ | ० |

संदर्भीय शासन निर्णयान्वये, मा.उपायुक्त (पुरवठा) अमरावती विभाग अमरावती यांनी खालीलप्रमाणे हातची किंमत निश्चित केलेली आहे.

| अ.क्र. | जिल्हा | बारदानाचा प्रकार | निश्चित करण्यात आलेली हातची किंमत | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | उपयोगी बारदाना (५० किलो) | निरुपयोगी बारदाना (५० किलो) | तुकडा बारदाना (५० किलो) |
| १ | वाशिम | ज्युट बारदाना | १५.०० | ८.०० | ४.०० |
| २ | | प्लास्टीक बारदाना | ५.०० | २.५० | १.०० |

वरील दरानुसार विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या बारदान्याची किंमत खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | बारदानाचा प्रकार | वाशिम जिल्हयातील बारदाना संख्या | हातची किंमत धरुन बारदान्याची होणारी एकुण रक्कम रु. | उपयोगी, निरुपयोगी, तुकडा बारदान्याच्या एकुण किंमतीच्या २%प्रमाणे होणारी इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | उपयोगी बारदाना ज्युट | २४८५ | ३७२७५ | ७४६ |
| २ | उपयोगी बारदाना प्लास्टीक | १५४७ | ७७३५ | १५५ |
| ३ | निरुपयोगी बारदाना ज्युट | २८२५५ | २२६०४० | ४५२१ |
| ४ | निरुपयोगी बारदाना प्लास्टीक | २४०७ | ६०१८ | १२१ |
| ५ | तुकडा ज्युट व प्लास्टीक बारदाना | ० | ० | ० |
| | एकुण | ३४६९४ | २७७०६८ | ५५४३ |

वाशिम जिल्हयातील शासकीय धान्य गोदामातील शिल्लक उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदान्याची जाहीर ई-निविदाद्वारे विक्री करणे बाबत अटी व शर्ती:-

१. ई-निविदा करावयाच्या बारदाना निविदाधारकास संबंधित गोदामामध्ये कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२. सदर बारदानाचा साठा संबंधित गोदामातुन ज्या ठिकाणी आहे तेथुन स्वखर्चाने उचलावा लागेल. कोणत्याही परिस्थितीत बारदाना निवडुन घेता येणार नाही.
३. एखादा बारदाना उपयोगी , निरुपयोगी किंवा तुकडा आहे किंवा कसे हे ठरविण्याचे अधिकार संबंधित तालुक्याचे तहसिलदार यांना आहे. याबाबतीत त्यांचा निर्णय अंतीम राहील व त्यानुसार बारदानाची उचल यशस्वी निविदाधारकास बंधनकारक राहील.
४. निविदेमध्ये कोणत्याही प्रकारची अट नमुद करु नये.
५. निविदेमध्ये भाग घेण्यासाठी स्वत:चे नाव, फर्मचे नाव, पत्ता, ई-मेल, दुरध्वनी क्रमांक नमुद करावे.

संस्था/फर्म असल्यास नोंदणी क्रमांक, पॅन कार्ड क्रमांक, आयकर किंवा GST करदाता असल्यास तसे प्रमाणपत्र, GST क्रमांक इत्यादी बाबींची पुर्तता करणे आवश्यक राहील. अन्यथा, निविदेमध्ये भाग घेता येणार नाही.(यासाठीची आवश्यक कागदपत्रे संकेत स्थळावर upload करण्यात यावे.)

६. निविदा फी रु. ५००/- इतकी राहील. निविदा फी परत केली जाणार नाही.

७. बारदान्याच्या हातच्या एकुण किंमतीच्या २% इतकी इसाऱ्याची रक्कम रु. ५५४३/- विक्रीच्या पध्दतीनुसार ऑफलाईन (डी.डी.) धनाकर्षाद्वारे जिल्हा पुरवठा अधिकारी वाशिम यांचे नावे भरणे बंधनकारक राहील.

८. ज्यांनी इसारा रक्कम भरलेली असेल, त्यांना निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेणे बंधनकारक आहे. निविदा प्रक्रियेमध्ये भाग न घेतल्यास अथवा भाग घेऊन कार्यवाही अपूर्ण ठेवल्यास त्यांची इसाऱ्याची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात येईल.

९. निविदेचा निकाल अधिसुचित करण्यात आल्यानंतर , मंजुर निविदाकाराने ७ दिवसांच्या आत करारनामा करुन खरेदी मुल्याच्या ३% इतकी अनामत रक्कम धनाकर्षाद्वारे जिल्हा पुरवठा अधिकारी वाशिम यांचे नावे जमा करावी. अनामत रकमेवर कोणतेही व्याज देय राहणार नाही.

१०. विहित कालावधीत बारदान्याची उचल न केल्यास निविदा मंजुरी आदेश रद्द करण्यात येवुन ३% अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

११. कोणत्याही कारणास्तव बारदानाची किंमत हप्त्याने भरण्याची मुभा दिली जाणार नाही किंवा तशी विनंती यशस्वी निविदाकारास करता येणार नाही. करारनामा केल्यानंतर व पुर्ण रक्कमेचा भरणा केल्यानंतर बारदाना उचलीचे आदेश दिले जातील. एकदा भरणा केलेली रक्कम कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.

१२. यशस्वी निविदाकाराने बारदानाची उचल केल्यानंतर बारदाना ताब्यात घेतल्यानंतर त्यात नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी शासनाची राहणार नाही. एकदा बारदान्याची उचल केल्यानंतर अथवा ताब्यात घेतल्यानंतर कोणत्याही कारणास्तव बारदाना परत घेतला जाणार नाही.

१३. वित्तीय अधिकारानुसार जर निविदा मंजुरीची बाब ही विभागीय आयुक्त अथवा शासनाच्या अधिकार क्षेत्रातील असल्याने किंवा इतर प्रशासकीय कारणाने विभागीय आयुक्त/शासन स्तरावरुन निविदा मंजुरीस विलंब झाला त्या दरम्यान बारदानाची प्रत खराब झाली तर यशस्वी निविदाकाराचे मंजूर दरात कपात केली जाणार नाही. मंजुर मुळ दरावर किंमत भरणा करावी लागेल. निविदा काढल्यापासुन ती मंजुर होईपर्यंत उपरोक्त कारणाने होणाऱ्या विलंबामुळे त्या दरम्यान बारदानाची प्रत खराब झाली तरीही ती जबाबदारी शासनावर राहणार नाही.

१४. कोणतीही निविदा मंजुर करण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी वाशिम यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१५. सदर जाहीर निविदा प्रक्रीयेद्वारे विक्री करावयाच्या बारदान्याची हातची किंमत रु. २७७०६८ /- असुन सदर रक्कमे पुढून बोली लावणे आवश्यक आहे.

१६. निविदेतील अटी व शर्तीसंबंधी, बारदाना उचलीबाबत करारनामा संबंधी काही वाद निर्माण झाल्यास प्रकरण अंतिम निर्णयासाठी शासनाकडे सोपविण्यात येईल व अशा प्रकरणी शासनाचा निर्णय अंतिम राहील आणि तो यशस्वी निविदाकारास बंधनकारक राहील. शासनाच्या निर्णयाआधी यशस्वी निविदाकारास उक्त वाद प्रकरणी दिवाणी न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

१७. मंजुर निविदाकाराकडुन (H-१) दिलेल्या मुदतीत उचल न झाल्यास अथवा सदर निविदाकाराने निविदेतील अटी/शर्तींचा भंग केल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करुन सदर निविदाकारास प्रतिबंधित करण्यात येईल. अशा वेळी (H-२) या निविदाकारास विचारणा करण्यात येईल. H-२ या निविदाकाराने नकार दिल्यास निविदा प्रक्रिया रद्द करण्यात येईल.

१८. सर्व इच्छुक व्यक्ती, खरेदीदार, कंपनी, फर्म यांना ई-निविदेत भाग घेण्यासाठी विनंती करण्यात येत आहे. ई-निविदेत भाग घेण्यासाठी डिजीटल स्वाक्षरी सर्टीफिकेट (DSC) असणे आवश्यक आहे. विहीत मुदतीत ई-निविदामध्ये भाग घेण्यासाठी www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर संगणकीय नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच ई-मेल आयडी, राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष प्रत, पॅनकार्ड प्रत व रहिवाशी दाखला इत्यादी कागदपत्रे व पुरावा दिनांक२१/१२/२०२० ते दि.३०/१२/२०२० पर्यंत अपलोड करुन रजीस्ट्रेशन करता येईल. ज्या खरेदीदारांनी वरील प्रमाणे संगणकीय नोंदणी केली असेल व निविदेमध्ये खरेदीसाठी आवश्यक इसारा रक्कम जिल्हा पुरवठा अधिकारी वाशिम यांच्या नावे देय असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डीडी) दिनांक२१/१२/२०२० ते ३०/१२/२०२० रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत किंवा त्यापुर्वी या कार्यालयात जमा केला असेल त्यांनाच ई-निविदेमध्ये भाग घेता येईल.

१९. उपरोक्त ई-निविदा प्रक्रियेत भाग घेणाऱ्या निविदाकाराने त्यांची संपूर्ण बारदाण्याची खरेदी किंमत पूर्ण रुपयात सोबत जोडलेल्या दराचे प्रपत्र - ब मध्ये नोंदवून, सदरचे प्रपत्र 'ब' पी.डी.एफ. स्वरुपात ऑनलाईन www.mahatenders.gov.in संकेत स्थळावर सादर (upload) करावे.

(शण्मुगराजन एस.)
जिल्हाधिकारी वाशिम

का.प्र.

प्रतिलिपी :- १. सहसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग , मंत्रालय मुंबई ३२.
२. शासनाचे उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई ३२
३. उपायुक्त पुरवठा अमरावती विभाग अमरावती यांना माहितीस.
४. जिल्हाधिकारी अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/अकोला यांना माहितीस्तव.
५. वित्तीय सल्लागार व उपसचिव अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई.
६. उपविभागीय अधिकारी वाशिम/कारंजा/मंगरुळपीर यांना माहितीस्तव व उचीत कार्यवाहीस्तव अग्रेषित.
७. तहसिलदार वाशिम/मालेगाव/रिसोड/मंगरुळपीर/कारंजा/मानोरा यांना माहितीस्तव व उचीत कार्यवाहीस्तव अग्रेषित.

(शण्मुगराजन एस.)
जिल्हाधिकारी वाशिम

का.प्र.

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा विभाग वाशिम**
**जुन २०२० अखेर पर्यंतच्या शासकीय धान्य गोदामातील शिल्लक उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदान्याची जाहीर ई-निविदाद्वारे विक्रीबाबत**

---

**प्रपत्र - ब**

**(ई-निविदा खरेदी प्रक्रियेत भाग घेणाऱ्या निविदाकाराने नमुद करावयाची खरेदी किंमतीचे दर विवरणपत्र)**

वाशिम जिल्हायातील वाशिम, मालेगाव, रिसोड, मंगरुळपीर, कारंजा, मानोरा तालुकानिहाय शासकीय धान्य गोदामातील जुन २०२० अखेर पर्यन्तच्या शिल्लक बारदाण्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

मान्यता प्राप्त दरानुसार विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या बारदान्याची किंमत खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | बारदानाचा प्रकार | वाशिम जिल्हयातील बारदाना संख्या | हातची किंमत धरुन बारदान्याची होणारी एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | उपयोगी बारदाना ज्युट | २४८५ | ३७२७५ |
| २ | उपयोगी बारदाना प्लास्टीक | १५४७ | ७७३५ |
| ३ | निरुपयोगी बारदाना ज्युट | २८२५५ | २२६०४० |
| ४ | निरुपयोगी बारदाना प्लास्टीक | २४०७ | ६०१८ |
| ५ | तुकडा ज्युट व प्लास्टीक बारदाना | ० | ० |
| | एकूण | ३४६९४ | २७७०६८ |

१. वाशिम जिल्हयातील शासकीय धान्य गोदामातील शिल्लक उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदान्याची जाहीर ई-निविदा प्रक्रीयेद्वारे विक्री करावयाच्या बारदान्याची हातची किंमत रु. २७७०६८ /- असून सदर रक्कमे पुढून बोली लावणे आवश्यक आहे.

२. वरील बारदाना ई-निविदा प्रक्रियेत भाग घेणाऱ्या निविदाकाराने त्याची खरेदी किंमतीचा दर खालील विवरणपत्रात नोंद करुन सदरचे प्रपत्र- "ब" पी.डी.एफ. स्वरुपात www.mahatenders.gov.in संकेत स्थळावर ऑन लाईन (दराचा लिफाफा) म्हणून सादर (upload) करावे.

| ई-निविदा प्रक्रियेत विक्रीसाठी उपलब्ध बारदाण्याची शासकीय हातची किमान किंमत रुपये | निविदा सादरकर्त्यांने दिलेली उपलब्ध बारदाण्यासाठीची खरेदी किंमत (कर व अन्य फी स्वतंत्रपणे भरणा करावी लागेल) | |
|---|---|---|
| | अंकात रुपये | अक्षरी रुपये |
| (१) | (२) | (३) |
| रुपये २,७७,०६८/-<br>(अक्षरी रुपये दोन लाख सत्यांत्तर हजार अडोसष्ठ फक्त) | | |

वरीलप्रमाणे मी, रकाना क्र.२ व ३ मध्ये नमुद केलेल्या किंमतीस ई-निविदेमध्ये नमुद विक्रीसाठी उपलब्ध संपूर्ण बारदाणा खरेदी करण्यास तयार आहे. तसेच सदर किंमती व्यतिरीक्त कोणतेही शासकीय कर (जी.एस.टी./आयकर इ.) मी स्वतंत्रपणे भरणा करणार आहे.

ई-निविदेतील अटी/शर्तीस अनुसरुन मी, विहीत कालावधीत खरेदी किंमत भरणा न केल्यास, माझी अनामत रक्कम जप्त करण्यास माझी हरकत नाही.

(१) निविदाकाराची स्वाक्षरी :-

(२) निविदाकाराचे संपूर्ण नाव व पत्ता :-

(३)दुरध्वनी / मोबाईल क्रमांक :-

(४) असल्यास, ई-मेल पत्ता :-

निविदाकाराची स्वाक्षरी

# जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा विभाग वाशिम

काटा रोड वाशिम

दुरध्वनी क्रमांक :- ०७५२-२२३३६५२ ई-मेल washimdso@gmail.com


क्र.कक्ष-१४/गोदाम/अका/कावि- १८६/२०२० दिनांक :-१६/१२/२०२०

प्रति,

उपसंचालक,
विभागीय माहिती कार्यालय,
अमरावती.

**विषयः- वाशिम जिल्हातील बारदाना विल्हेवाटीकरीता जाहिरात प्रसिध्द करणे बाबत.**

संदर्भ:- शासन निर्णय क्र:विल्हेवा-३०१८/प्र.क्र.६४/ना.पु.१६-अ दि.१० ऑक्टोबर २०१८.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास विनंती करण्यात येते की, वाशिम जिल्हयातील शासकीय धान्य गोदामातील उपयोगी, निरुपयोगी बारदाना विल्हेवाटी करीता यासोबत जोडलेली ई-निविदा सुचना खालील तपशिलानुसार दोन वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

| अ.क्र. | जाहीरातीसंबंधीत बाब | तपशिल |
|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नाव | जिल्हा पुरवठा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम |
| २ | दुरध्वनी क्रमांक | ०७५२-२२२३३६५२ |
| ३ | जाहीरात प्रकाशीत करावयाचा दिनांक | दि.२१/१२/२०२० |
| ४ | वृत्तपत्रे | विभागीय स्तरावरील सर्वाधिक खपाच्या एका व राज्यातील सर्वाधिक खपाच्या एका वृत्तपत्रात एक वेळ (कमीत कमी जागेत) |
| ५ | जाहिरात देयक सादर करणे | जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम |

सहपत्र :- जाहिरात मसुदा तीन प्रतीत.

( सुनिल विंचनकर )
जिल्हा पुरवठा अधिकारी,
वाशिम